पवित्र श्रावण मासारंभानिमित्त मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २२०। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | गुरूवार १० /०९/२०२६ । पाने - ६

सिल्क फेस्टिव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

# पावसाने पाठ फिरवली; बळीराजा पुन्हा संकटात

## उत्सवांवरील कोट्यवधींच्या खर्चाला काही काळ फाटा देत शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याची गरज

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मागील वर्षी अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि नैसर्गिक आपत्तीने अक्षरशः कंबरडे मोडलेल्या शेतकऱ्यांसमोर यंदा पावसानेच पाठ फिरवल्याचे गंभीर संकट उभे ठाकले आहे. मागील वर्षाच्या नुकसानीतून अद्याप पूर्णपणे सावरता आलेले नाही, कर्जाचा डोंगर कायम आहे, शासनाने कर्जमाफीची घोषणा केली असली तरी अनेक शेतकरी अद्याप त्याच्या लाभापासून वंचित आहेत. अशा परिस्थितीत यंदाच्या पावसाळ्यातही अनेक भागांत अपेक्षित पाऊस न झाल्याने बळीराजासमोर पुन्हा एकदा अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

महाराष्ट्रातील मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रासह अनेक भागांत पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने शेतीचे नियोजन कोलमडले आहे. काही भागांत पावसाने एक-दोनदा हजेरी लावली; मात्र त्यानंतर सातत्याने खंड पडल्याने पिकांची अवस्था बिकट झाली आहे. पावसाळा संपत आल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत दिवसेंदिवस भर पडत आहे. पाऊस कधी पडेल, किती पडेल आणि पडलेला पाऊस शेतीसाठी पुरेसा ठरेल की नाही, याची शाश्वती राहिलेली नाही.



उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक भागांत पावसाअभावी शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. विहिरी, तलाव आणि लहान-मोठे जलस्त्रोत यांच्यावर अवलंबून असलेल्या गावांमध्ये पाण्याचे नियोजन करणे प्रशासनासमोर आव्हान बनले आहे. शेतीसाठी पाणी उपलब्ध नसल्याने पिके धोक्यात आली असून, पिण्याच्या पाण्यासाठीही नागरिकांना वणवण करण्याची वेळ येऊ शकते.

शेतकऱ्याची अवस्था तर अधिकच दयनीय आहे. मागील वर्षी अतिवृष्टीने पिके आणि शेतीचे मोठे नुकसान झाले. त्यानंतर कर्जबाजारीपणाचा भार वाढला. यंदा पाऊसच नसल्याने उत्पादनाची आशा धूसर झाली आहे. त्यामुळे शेतकरी केवळ कर्जबाजारी होत नाही, तर आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त होण्याच्या उंबरठ्यावर पोहोचत आहे. राज्यातील शेतकरी आत्महत्यांच्या घटनाही या गंभीर परिस्थितीची जाणीव करून देत आहेत.

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारकडून कर्जमाफीच्या घोषणा करण्यात आल्या; मात्र प्रत्यक्ष लाभ मिळण्याच्या प्रक्रियेत अनेक शेतकरी अडकलेले आहेत. कागदपत्रे, पात्रता, तांत्रिक अडचणी आणि विविध प्रक्रियांमुळे पात्र असूनही काही शेतकरी मदतीपासून वंचित असल्याची भावना व्यक्त होत आहे. एकीकडे कर्जाचा ताण आणि दुसरीकडे पिकांचे नुकसान अशा दुहेरी कात्रीत शेतकरी सापडला आहे.

दरम्यान, राज्यात विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उत्सव मोठ्या उत्साहात साजरे होत आहेत. महाकुंभ मेळ्यासारख्या भव्य धार्मिक आयोजनांपासून विविध सण-उत्सव, महापुरुषांच्या जयंती आणि मिरवणुकांपर्यंत मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च होत आहे. विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि सर्वच समाजघटक या आयोजनांमध्ये उत्साहाने सहभागी होत असतात.

उत्सव आणि परंपरा या समाजजीवनाचा अविभाज्य भाग आहेत. मात्र आज जगाचा पोशिंदा असलेला शेतकरीच संकटात असताना उत्सवांवरील अनावश्यक आणि दिखाऊ खर्चाला काही काळ फाटा देऊन त्यातील काही निधी बळीराजाच्या मदतीसाठी वळवता येईल का, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

मोठ्या मिरवणुका, जाहिरातबाजी, सजावट, ध्वनिव्यवस्था आणि इतर अनावश्यक खर्चात काही प्रमाणात कपात करून तो पैसा दुष्काळग्रस्त शेतकरी, पाणीटंचाईग्रस्त गाव आणि संकटात सापडलेल्या कुटुंबांसाठी वापरला तर त्यातून मोठा सामाजिक संदेश जाऊ शकतो. यासाठी केवळ सरकारनेच नव्हे, तर राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी, उद्योगपती, सामाजिक संस्था आणि सर्वसामान्य नागरिकांनी पुढाकार घेण्याची गरज आहे.

पावसाची प्रतीक्षा करत बसण्यापेक्षा सरकारने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून संभाव्य दुष्काळग्रस्त भागांचे तातडीने सर्वेक्षण करावे. (पान ५ वर)

# सीसीटीव्ही ठरले वरदान; २४ तासांत सोन्याच्या चोरीचा छडा

## बसस्थानकावरील महिलेचे तीन तोळे सोने पोलिसांनी केले हस्तगत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर नगरपालिकेच्या वतीने शहरात बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची उपयुक्तता उद्घाटनानंतर अवघ्या काही दिवसांतच प्रकर्षाने समोर आली आहे. बसस्थानक परिसरात महिलेच्या अंगावरील तब्बल तीन तोळे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याच्या घटनेचा सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी अवघ्या २४ तासांत छडा लावत चोरी गेलेले सोने हस्तगत केले. त्यामुळे शहराच्या सुरक्षेसाठी उभारलेली सीसीटीव्ही यंत्रणा पोलिसांसाठी 'तिसरा डोळा' ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

संगमनेर बसस्थानक परिसरात एका महिलेच्या अंगावरील सुमारे तीन तोळे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तपासाला वेग दिला. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासताना पोलिसांच्या हाती महत्त्वाचे धागेदोरे लागले.

फुटेजच्या आधारे संशयित महिलेचा माग काढण्यात पोलिसांना यश आले. त्यानंतर तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी अवघ्या २४ तासांत चोरी गेलेले तीन तोळे सोने हस्तगत केले. पोलिसांच्या या तत्पर कारवाईमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. शहरातील विविध महत्त्वाच्या ठिकाणी बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे केवळ गुन्हे रोखण्यासच नव्हे, तर घडलेल्या गुन्ह्यांचा तपास जलदगतीने करून आरोपींपर्यंत पोहोचण्यासही मोठी मदत होत आहे. बसस्थानकावरील सोन्याच्या चोरीचा अल्पावधीत लागलेला छडा हे त्याचे ठळक उदाहरण ठरले आहे.

# संभाजीनगरात आरक्षणावर खलबतं !

## जरांगे पाटलांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी सरकारची हालचाल

मनोज जरांगे पाटील हे गेल्या १२ दिवसापासून उपोषणाला बसले आहेत. जरांगेंनी अन्नपाणी सोडल्याने त्यांची प्रकृती खालावली आहे. त्यांनी उपचार घेण्यास सुरुवात केली असली तरी त्यांच्या प्रकृतीत म्हणावा तसा फरक पडलेला नाही. त्यातच मराठा समाज अधिक आक्रमक झाला असून राज्यात अनेक ठिकाणी रास्ता रोको आणि बंद पुकारला जात आहे. त्यामुळे परिस्थिती हाताबाहेर जाताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारवरही दबाव वाढला आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने आज छत्रपती संभाजीनगरात तातडीची बैठक बोलावली आहे. या बैठकीत जरांगे यांच्या प्रश्नावर निर्णायक तोडगा काढला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे संभाजी नगरात मोठ्या घडामोडी घडणार असून याकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागलं आहे.सरकारचे शिष्टमंडळ, माजी



न्यायमूर्ती शिंदे समिती आणि मराठा आरक्षण अभ्यासकांची आज छत्रपती संभाजीनगरात महत्त्वाची बैठक पार पडत आहे. स्मार्ट सिटी कार्यालयात ही बैठक होत आहे. त्यामुळे या कार्यालया भोवती पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आल्याने कार्यालयाला पोलिस छावणीचे स्वरूप आले आहे. आजच्या बैठकी हैदराबाद गॅझेटनुसार मिळालेल्या कुणबी नोंदी आणि प्रमाणपत्र काढताना येणाऱ्या अडचणींवर चर्चा होणार आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर या बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झालं आहे. बैठकीला सरकारकडून कोण उपस्थित असणार हे अद्याप समोर आलेलं नाही. कालच राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत आणि भाजप आमदार प्रसाद लाड हे छत्रपती संभाजी नगरात आले होते. त्यांनी मराठा आरक्षण अंमलबजावणीचा आढावा घेतला आहे. त्यामुळे हे दोन्ही नेते आजच्या बैठकीला उपस्थित राहणार का? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. तसेच आजच्या या महत्त्वाच्या बैठकीनंतर जरांगे पाटील यांचे समाधान होणार का? जरांगे उपोषण मागे घेणार का? याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागलं आहे.दरम्यान, जरांगे यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर मराठा समाज आक्रमक झाला आहे.

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त
ऑफर मिळतेय जबरदस्त !
FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

सोन्यांच्या दागिन्यांची मजुरी फक्त 7%
मुदत फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
PBM Jeweller's
श्रावण मास आणि रक्षाबंधन निमित्त
चांदी खरेदीवर 30% DISCOUNT
ऑफर फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर चावडी जवळ, संगमनेर
7599996999 / 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# कर्जाचे हप्ते थकले, मुलांच्या फीची अडचण

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - दिवस-रात्र जीव धोक्यात घालून अल्प पगारावर काम करणाऱ्या कंत्राटी वीज कर्मचाऱ्यांवर आता आर्थिक संकटाची मोठी कुऱ्हाड कोसळली आहे. दर महिन्याला ठराविक तारखेला बँक खात्यात जमा होणारा पगार दोन महिने उलटूनही जमा न झाल्याने वीज कंत्राटी कामगारांमध्ये तीव्र नाराजी आणि चिंता व्यक्त होत आहे.

महिन्याच्या सुरुवातीलाच घरखर्च, मुलांच्या शाळा-कॉलेजची फी, वृद्ध आई-वडिलांच्या औषधोपचारांचा खर्च, घरकर्ज, वाहनकर्ज तसेच वैयक्तिक कर्जाचे हप्ते अशा अनेक आर्थिक जबाबदाऱ्या कर्मचाऱ्यांसमोर उभ्या असतात. मात्र, पगार वेळेवर जमा न झाल्याने या सर्व आर्थिक गणिताचा ताळमेळ बिघडला आहे.

अनेक वीज कंत्राटी कर्मचाऱ्यांनी घरगुती गरजा भागविण्यासाठी तसेच विविध कारणांसाठी घेतलेली कर्जे आणि बँकेच्या ईएमआयची रक्कम खात्यात पैसे नसल्यामुळे थकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वेळेत हप्ता न भरल्यास बँकेकडून अतिरिक्त दंड व भुर्दंड सहन करावा लागू शकतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर आर्थिक ताण अधिकच वाढत आहे. आम्ही वेळेवर कर्तव्य बजावतो, मग आमचा पगार वेळेवर का नाही? असा संतप्त सवाल कर्मचाऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. पगाराच्या विलंबामुळे कर्मचाऱ्यांच्या मानसिक तणावातही वाढ होत असल्याचे चित्र आहे. या गंभीर आर्थिक प्रश्नाबाबत कर्मचारी प्रतिनिधींनी प्रशासकीय विलंब आणि ठेकेदाराच्या ढिसाळ कारभारावर बोट ठेवले आहे. महिनाभर सेवा बजावूनही वेळेवर वेतन मिळत नसल्याने कर्मचारी कुटुंबीयही मेटाकुटीस आले आहेत.

दरम्यान, महावितरण मधील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या समस्येकडे तातडीने व गांभीर्याने लक्ष घालून रखडलेला पगार तत्काळ जमा करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. कर्तव्य बजावताना कोणतीही तडजोड न करता जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या वीज कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत प्रशासनानेही गांभीर्याने भूमिका घेऊन पगार वितरणातील विलंब कायमचा दूर करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# शेतकऱ्यांच्या स्वप्नांना तडे; बळीराजा आर्थिक कोंडीत

## एकरी २५ हजारांचा खर्च वाया; पीक मोडायलाही ५ ते १० हजारांचा भुर्दंड!



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - कर्ज काढून, रक्ताचे पाणी करून आणि मोठ्या अपेक्षेने शेतात उभे केलेले पीकच आता शेतकऱ्यांच्या आर्थिक संकटाचे कारण ठरत आहे. बियाणे, खते, औषधे, मजुरी, पाणी, मशागत यासाठी एकरी हजारो रुपयांचा खर्च करूनही उत्पादन आणि बाजारभावाची सांगड बसत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की, उभे पीक काढून बाजारात नेण्यापेक्षा ते मोडून शेत मोकळे करण्याचा निर्णय घेण्याची वेळ काही शेतकऱ्यांवर आली आहे.

एका एकरातील पिकासाठी आतापर्यंत सुमारे २५ हजार रुपये खर्च झाले आहेत. मात्र उत्पादनातून हा खर्चही भरून निघण्याची शक्यता धूसर झाली आहे. त्यातच पीक मोडून टाकण्यासाठी, काढून टाकण्यासाठी अथवा शेत साफ करण्यासाठी पुन्हा ५ ते १० हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च करावा लागणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर एका पिकासाठी दुहेरी आर्थिक बोजा पडत आहे.

पीक जोमाने येईल, बाजारात चांगला दर मिळेल आणि घेतलेले कर्ज फेडता येईल, या आशेवर शेतकऱ्यांनी पिकांची लागवड केली. मात्र प्रतिकूल परिस्थिती, उत्पादनातील घट आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे त्यांच्या आशेवर पाणी फेरले आहे.

'शेतात पीक उभे करणेच आता जिकिरीचे झाले आहे. दिवसेंदिवस खर्च वाढत आहे; मात्र मालाला अपेक्षित भाव मिळत नाही. उभे पीक ठेवले तरी खर्च, काढले तरी खर्च आणि मोडले तरी पुन्हा हजारो रुपये खर्च करावे लागतात. पुढील हंगामाची पेरणी कशी करायची, हा मोठा प्रश्न आमच्यासमोर आहे,' अशी व्यथा शेतकरी व्यक्त करीत आहेत. उत्पादन खर्च वाढत असताना उत्पन्न घटत असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी दिवसेंदिवस तीव्र होत आहे. त्यामुळे शासनाने पीक नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य हमीभाव मिळवून द्यावा तसेच पीक मोडून शेत साफ करण्यासाठी येणाऱ्या अतिरिक्त खर्चाचाही मदतीत समावेश करावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

एकीकडे वाढता उत्पादन खर्च, दुसरीकडे अनिश्चित बाजारभाव आणि त्यात पीक मोडण्यासाठीचा अतिरिक्त भुर्दंड, अशा तिहेरी संकटात बळीराजा सापडला आहे. कर्जाचा डोंगर वाढत असताना हातात पैसा उरणार नसेल तर पुढचा हंगाम कसा उभा करायचा? या प्रश्नाने शेतकऱ्यांची चिंता वाढली असून, आता शासनाच्या तातडीच्या मदतीकडे बळीराजाचे लक्ष लागले आहे.

# आदिवासी आश्रमशाळांतील चौकशी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह !

## ३ सप्टेंबरच्या परिपत्रकामुळे प्रशासकीय वर्तुळात नाराजी




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर-आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांमध्ये घडणाऱ्या विविध घटनांची चौकशी करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या नव्या प्रक्रियेवरून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ३ सप्टेंबर २०२६ रोजी आदिवासी विकास विभागाच्या आयुक्तांनी जारी केलेल्या परिपत्रकानुसार चौकशी समितीत गृहपाल, अधीक्षक व अधीक्षिका यांचा समावेश करण्यात आल्याने मुख्याध्यापकांच्या चौकशीबाबत आक्षेप घेतला जात आहे.

मुख्याध्यापकांच्या अधिपत्याखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचाच चौकशी समितीत समावेश करण्यात आल्याने 'अधीनस्थांकडूनच वरिष्ठांची चौकशी' अशी स्थिती निर्माण होत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे चौकशी प्रक्रियेची निष्पक्षता, प्रशासकीय शिस्त आणि अधिकारांच्या उतरंडीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

राज्यात सुमारे ३० एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांच्या माध्यमातून शासकीय तसेच निमशासकीय आश्रमशाळांचे कामकाज चालते. या शाळांमध्ये अपुरा कर्मचारी वर्ग, आवश्यक भौतिक सुविधांचा अभाव आणि व्यवस्थापनासाठी पुरेशा निधीची कमतरता असल्याच्या तक्रारी यापूर्वीही समोर आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक गरजा तसेच किरकोळ दुरुस्तीसाठी उपलब्ध होणारा निधीही अपुरा पडत असल्याचे सांगितले जाते.

दरम्यान, काही आश्रमशाळांमध्ये मुख्याध्यापकांवर गैरप्रकार अथवा प्रशासकीय त्रुटींच्या आरोपांवरून निलंबनाची कारवाई झाल्याची उदाहरणे आहेत. अशा परिस्थितीत चौकशी समितीची रचना अत्यंत पारदर्शक आणि सर्व स्तरांवर विश्वास निर्माण करणारी असणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. मात्र, चौकशी समितीत मुख्याध्यापकांचा समावेश न करता त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांना स्थान देण्यात आल्याने या निर्णयावर नाराजी व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, गृहपाल, अधीक्षक व अधीक्षिका ही पदे मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे त्यांच्याकडूनच मुख्याध्यापकांची चौकशी करण्याची प्रक्रिया राबविल्यास अधिकारांच्या उतरंडीचा आणि प्रशासकीय शिस्तीचा नेमका आधार काय?, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

गृहपाल पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तींची पुढे अधीक्षक पदावर पदोन्नतीने नियुक्ती होत असल्याने चौकशी समितीची रचना करताना पदानुसार अधिकार, जबाबदारी आणि प्रशासकीय वरिष्ठता यांचा योग्य विचार करणे आवश्यक असल्याचे मतही व्यक्त होत आहे.

आदिवासी आश्रमशाळांमध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने तेथील प्रत्येक प्रशासकीय निर्णयाचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर, सुरक्षिततेवर आणि सुविधांवर होतो. त्यामुळे कोणत्याही घटनेची चौकशी पारदर्शक, निष्पक्ष, वस्तुनिष्ठ आणि नियमबद्ध पद्धतीने होणे आवश्यक आहे. चौकशी समितीच्या रचनेबाबत निर्माण झालेला संभ्रम दूर करून वरिष्ठता, अधिकार आणि जबाबदारी यांचा योग्य समतोल राखणारी सुधारित प्रक्रिया निश्चित करावी, अशी मागणी आता पुढे येत आहे.

# काशिनाथ मालुंजकर यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)अकोले - तालुक्यातील रुंभोडी( मालुंजकर वाडी) येथील धार्मिक वृत्तीचे काशिनाथ गेणू मालुंजकर ( वय ९० ) यांचे आज मंगळवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ व चार मुले ,एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.अकोले येथील राजपुष्प फ्लेक्सचे संचालक राजेंद्र मालुंजकर, शिक्षक केशव मालुंजकर,खासगी कंपनी मध्ये सेवेत असणारे अरविंद मालुंजकर, लँड डेव्हलपर्स व शेतकरी बाळासाहेब मालुंजकर, सौ.उषा पंढरीनाथ आरोटे यांचे ते वडील होत. त्यांच्या वर रुंभोडी येथे प्रवरा तिथी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.


**श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी**

मु. माळवाडी पो. बोटा ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ४२२६०२

मो. नं. 7588094642/43 shrisamarthcop@gmail.com

Approved by PCI, DTE, DBATU, MSBTE & Govt. of Maharashtra

**थेट द्वितीय वर्ष बी फार्मसी प्रवेश सूचना 2026-27)Spot Round)**

शैक्षणिक पात्रता: फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (PCI) किंवा 'AICTE' द्वारे मान्यताप्राप्त संस्थेतून डिप्लोमा इन फार्मसी (D.Pharm) उत्तीर्ण केलेले असणे आवश्यक आहे

डायरेक्ट सेकंड इयर बी. फार्मसी वर्षाच्या संस्थात्मक (Institute Level) प्रवेशासाठी व CAP Round नंतर रिक्त राहणाऱ्या जागांसाठी महाविद्यालय स्तरावरील प्रवेश प्रक्रिया फार्मसी कौन्सिल ऑफ महाराष्ट्र राज्य व शासनाच्या नवीन नियमांनुसार भरण्यात येईल.

तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी आपली सर्व शैक्षणिक कागदपत्रे घेऊन महाविद्यालयात त्वरित संपर्क साधावा.

DTE Code: 5484

| अ.क्र. | कार्यपद्धती | दिनांक |
| --- | --- | --- |
| १. | कॉलेजस्तरावर अर्ज आणि प्रवेश पत्र स्वीकारण | 09-08-2026 ते 14/09/2026 |
| २. | अंतिम गुणवत्तायादी | 14/09/2026 दुपारी 1.00 pm |
| ३. | प्रवेश घेण्याची अंतिम तारीख | 14/09/2026 दुपारी 5.00 pm |
| ४. | निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे 2026-27 शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेश व नोंदणीची अंतिम तारीख | 14/09/2026 सायं. 5.00 pm |

प्राचार्य

श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी


# बसमधून वृद्ध महिलेचे साडेतीन लाखांचे दागिने लंपास




युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव - पुण्याहून नाशिककडे जाणाऱ्या जनशिवनेरी बसमधून प्रवास करणाऱ्या ६३ वर्षीय वृद्ध महिलेच्या बॅगेतील तब्बल ३ लाख ५९ हजार ६७५ रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घारगाव येथे घडली. अवघ्या पाच मिनिटांच्या नाश्त्याच्या वेळेत चोरट्यांनी ही चोरी केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नऱ्हे (पुणे) येथील प्रेमा रामचंद्र निलसकर या ३ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता शिवाजीनगरहून जनशिवनेरी बसने नाशिकला जात होत्या. त्यांच्यासोबत त्यांची नात श्रावणी पाटील होती. मुलीच्या नवीन घराच्या कार्यक्रमासाठी तसेच नातवाच्या बारसिंगसाठी त्यांनी खरेदी केलेले सोन्या-चांदीचे दागिने बॅगेत ठेवले होते.

सकाळी सव्वाआठच्या सुमारास बस घारगाव येथील दौलत हॉटेलवर नाश्त्यासाठी थांबली. निलसकर व त्यांची नात बॅग बसमध्ये ठेवून नाश्त्यासाठी खाली उतरल्या. याच संधीचा फायदा घेत पांढऱ्या रंगाच्या कारमधून आलेल्या तीन चोरट्यांपैकी दोघांनी बसमध्ये प्रवेश केला. अवघ्या पाच मिनिटांत बॅगेतील दागिने चोरून तिघेही कारमधून पसार झाले.

नाशिकला पोहोचल्यानंतर दागिने चोरीस गेल्याचे लक्षात आल्यानंतर निलसकर यांनी पोलिसांशी संपर्क साधला. त्यानंतर हॉटेल परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. त्यात पांढऱ्या कारमधून आलेल्या तीन संशयितांची हालचाल दिसून आली.

चोरलेल्या दागिन्यांमध्ये सोन्याच्या चार बांगड्या, झुमके, मिनी मंगळसूत्र, साखळी, अंगठी तसेच चांदीचे तोडे यांचा समावेश आहे. या दागिन्यांची एकूण किंमत ३ लाख ५९ हजार ६७५ रुपये आहे.

याप्रकरणी तीन अज्ञात चोरट्यांविरुद्ध घारगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांकडून संशयितांचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# वीज चोरीला आळा घाला; अधिकृत वीज वापरा

## महावितरणचे उपकार्यकारी अभियंता श्रीकांत सोनवणे यांचे आवाहन




युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- वीज चोरी, अनधिकृत जोडणी, मीटरमध्ये फेरफार किंवा मीटर बायपास करून वीज वापरणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा आहे. त्यामुळे ग्राहकांनी अधिकृत वीज जोडणीचा वापर करून नियमित वीज बिल भरावे, असे आवाहन महावितरण अकोले उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता श्रीकांत सोनवणे यांनी केले आहे.

सध्या वीज मागणीत वाढ होत असल्याने विशेषतः संध्याकाळच्या वेळेत वीज वापराचे नियोजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या काळात गिझर, हीटर, इस्त्री, एअर कंडिशनर, मोठ्या क्षमतेच्या मोटारी यांसारख्या अधिक वीज वापरणाऱ्या उपकरणांचा वापर शक्यतो टाळावा. अनावश्यक दिवे, पंखे व उपकरणे बंद ठेवून विजेची बचत करावी.

वीज चोरीमुळे वितरण व्यवस्थेवर अतिरिक्त भार पडतो आणि प्रामाणिकपणे वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांवरही त्याचा परिणाम होतो. त्यामुळे परिसरात वीज चोरी किंवा अनधिकृत जोडणी आढळल्यास महावितरणच्या संबंधित कार्यालयाला माहिती द्यावी.

दरम्यान, ग्राहकांनी सौरऊर्जेचा वापर वाढवावा, तसेच पाणी गरम करण्यासाठी सोलर वॉटर हीटर आणि शेतकऱ्यांनी सौर कृषीपंपांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वीज चोरी आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल. वीज वाचवा, भार कमी करा आणि सुरक्षित वीज व्यवस्थेसाठी महावितरणला सहकार्य करा, असे आवाहन श्रीकांत सोनवणे यांनी केले आहे.


**संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित, संगमनेर •**

रजि.नं. : ए.एन.आर./पी.आर.डी./(आय) १२०१/१९८० रजि.ता. २४/११/१९८०

।। उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मी ।।

**संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहत मर्या; संगमनेर**

ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर. (०२४२५) २५९०२९ E-mail : sangam.sav@gmail.com

Website - www.sangamnercie.com

**अधिमंडळाच्या ४६ व्या वार्षिक सभेची नोटीस**

(फक्त सभासदांकरिता)

आपणास कळविण्यात येते की, आपल्या संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित, संगमनेर, जि. अहिल्यानगर या संस्थेची सन २०२५-२६ या वर्षाची ४६ वी अधिमंडळ वार्षिक सभा सोमवार दि. २८/०९/२०२६ रोजी सकाळी १0.00 वा. सन्माननीय चेअरमन श्री. किसन केशवराव थोरात यांचे अध्यक्षतेखाली सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सभागृह, उद्योगलक्ष्मी व्यापारी संकुल या ठिकाणी खालील विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

दिनांक : १०/०९/२०२६

**सभेपुढे येणारे विषय**

(१) मागील दि. ०९/०९/२०२५ चे अधिमंडळ वार्षिक सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

(२) सन २०२५-२०२६ या वर्षाचा ४६ व्या वार्षिक सभेचा संस्थेच्या कामकाजाचा अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक ही हिशोबाची पत्रके व संचालक मंडळाने सुचविलेली नफा विभागणी तसेच सन २०२६-२०२७ वर्षाकरिताचे तयार कलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

(३) सन २०२४-२०२५ या वर्षाचे दोष दुरूस्ती अहवाल व सन २०२५-२०२६ या वर्षाचा हिशोब तपासणी अहवालाची वाचून नोंद घेणे.

(४) सन २०२६-२०२७ वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणुक करणे.

(५) सन २०२६-२०२७ वर्षाकरिता अंतर्गत लेखापरिक्षक, कर सल्लागार, कायदेशीर सल्लागार, आर्किटेक्ट, इंजिनिअर व विद्युत सल्लागार यांची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.

(६) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मंजुरी देणे. (पान नं. २४ ते २७)

(७) थकबाकी वसुलीबाबत विचारविनिमय करणे.

(८) मा. अध्यक्ष साहेब यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशान्वये

**श्री. रविकिरण रमेश घुले**

प्र. मॅनेजर

संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहत मर्या; संगमनेर

✻ सभेस येताना अहवाल सोबत आणावा.

✻ **सुचना :** (१) सभेच्या नियोजित वेळेत गणपूर्ती न झाल्यास सभा तहकुब केली जाईल व तहकुब झालेली सभा त्याच दिवशी ३0 मिनिटे थांबुन घेण्यात येईल. त्या सभेस गणपुर्ती व वेगळ्या सुचनेची आवश्यकता रहाणार नाही. (२) सभासदांना अहवालातील कामकाजाच्या संदर्भात प्रश्न विचारावयाचे असतील किंवा सुचना करावयाच्या असतील तर दिनांक २३/०९/२०२६ रोजी सायं. ५.३0 पर्यंत कार्यालयात लेखी स्वरूपात द्यावेत. ऐनवेळी विचारलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही. (३) ज्या सहकारी संस्था, सोसायटी, कंपन्या, भागीदारी संस्था, जॉईट शेअर्स होल्डर, सभासदांना आपला प्रतिनिधी पाठवावयाचा असेल त्यांनी त्याबाबतचा ठराव दिनांक २३/०९/२०२६ रोजी सायं. ५.३0 पर्यंत कार्यालयात पाठवावा अन्यथा सभेच्या कामकाजात भाग घेता येणार नाही. यासाठी कंपनीच्या कर्मचाऱ्याचे नाव पाठवू नये. कंपनीच्या भागीदार किंवा संचालक यांचे नाव पाठवावे.

▶ ४६ वा वार्षिक अहवाल ▶ सन २०२५-२०२६

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# जागतिक फिजिओथेरपी दिन

## निरोगी जीवनशैलीसाठी फिजिओथेरपीचे महत्त्व



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- वेदना कमी करणे, शरीराची हालचाल सुधारणे, स्नायूंची ताकद वाढवणे तसेच दुखापत, आजार किंवा शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला पुन्हा दैनंदिन जीवनात परतण्यास मदत करण्यासाठी फिजिओथेरपी महत्त्वाची भूमिका बजावते, असे मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेरच्या फिजिओथेरपिस्ट डॉ. पायल रंगरेज यांनी सांगितले. दरवर्षी ८ सप्टेंबर रोजी जागतिक फिजिओथेरपी दिन साजरा केला जातो. शारीरिक हालचाल सुधारण्यास, शारीरिक मर्यादा कमी करण्यास आणि जीवनमान उंचावण्यास फिजिओथेरपीचे महत्त्व या निमित्ताने अधोरेखित केले जाते.

बदलती जीवनशैली, दीर्घकाळ बसून काम करणे, स्क्रीनचा वाढता वापर आणि शारीरिक व्यायामाचा अभाव यामुळे मानदुखी, पाठदुखी, खांदेदुखी, सांधेदुखी तसेच स्नायूंच्या समस्या वाढत आहेत. फिजिओथेरपीच्या माध्यमातून स्नायूंची ताकद, लवचिकता, शरीराचा समतोल, योग्य पोश्चर आणि सांध्यांची हालचाल सुधारण्यास मदत होते. फिजिओथेरपी केवळ वेदना कमी करण्यापुरती मर्यादित नाही. ऑर्थोपेडिक शस्त्रक्रियेनंतरचे पुनर्वसन, क्रीडा दुखापती, न्यूरोलॉजिकल समस्या तसेच विविध शारीरिक विकारांमध्ये फिजिओथेरपीची महत्त्वाची भूमिका असते. याबाबत डॉ. पायल रंगरेज म्हणाल्या, फिजिओथेरपी म्हणजे केवळ तात्पुरता वेदनाशामक उपचार नाही. शरीराच्या हालचालींमध्ये असलेली समस्या किंवा स्नायूंची कमतरता ओळखून रुग्णाची ताकद, हालचाल आणि आत्मविश्वास पुन्हा वाढवणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. प्रत्येक रुग्णाच्या गरजेनुसार तयार केलेला फिजिओथेरपी कार्यक्रम, योग्य व्यायाम आणि जीवनशैलीतील बदल यामुळे पुनर्वसन अधिक प्रभावी होऊ शकते. दीर्घकाळ वेदना किंवा हालचालींमध्ये अडथळा जाणवत असल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. स्वतःहून औषधे किंवा व्यायाम करण्याऐवजी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली उपचार घेणे अधिक सुरक्षित आणि प्रभावी ठरू शकते. हालचाल म्हणजे आरोग्याची ताकद; योग्य फिजिओथेरपी म्हणजे निरोगी आणि सक्रिय जीवनाची दिशा, असा संदेश जागतिक फिजिओथेरपी दिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर यांच्या वतीने देण्यात आला.

# संगमनेरात दहीहंडीचा थरार; सात थरांपुढे मानवी मनोरे रचत गोविंदा पथकांचा विक्रम

## हिंदु राष्ट्र शक्ती संघाच्या भव्य दहीहंडी उत्सवाला हजारोंची उपस्थिती

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -'गोविंदा रे गोपाळा'चा गगनभेदी जयघोष, ढोल-ताशांचा दणदणाट आणि गगनचुंबी मानवी मनोऱ्यांच्या थरारक प्रात्यक्षिकांनी संगमनेर बसस्थानक परिसर दुमदुमून गेला. हिंदु राष्ट्र शक्ती संघाच्या वतीने आयोजित भव्य दहीहंडी उत्सवात विविध गोविंदा पथकांनी सात थरांपुढे मानवी मनोरे रचत विक्रमाची नोंद केली. तब्बल १ लाख ५१ हजार रुपयांच्या रोख बक्षिसांची लयलूट असलेल्या या उत्सवाला हजारो संगमनेरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या महोत्सवाला आमदार सत्यजीतदादा तांबे यांचे विशेष सहकार्य लाभले.

सायंकाळी सहा वाजल्यापासूनच बसस्थानक परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. विविध गोविंदा पथकांनी एकापाठोपाठ एक थर रचत दहीहंडी फोडण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. सात थरांपुढे उभारण्यात आलेले मानवी मनोरे पाहून उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. गोविंदांच्या उत्साहाला प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट आणि जल्लोषात दाद दिली. या सोहळ्यास माजी मंत्री बाळासाहेब थोरात, मालपाणी उद्योग समूहाचे मनिष मालपाणी, स्वदेश उद्योग समूहाचे बाळासाहेब देशमाने तसेच मार्गदर्शक सत्यम वारे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते यशस्वी गोविंदा पथकांचा गौरव करण्यात आला.

**महिला व बालगोपालांच्या दहीहंडीने वेधले लक्ष-** उत्सवाचे विशेष आकर्षण ठरले ते महिला आणि बालगोपालांसाठी आयोजित स्वतंत्र दहीहंडीचे. महिला गोविंदांनी शिस्तबद्धपणे रचलेले थर तसेच चिमुकल्या गोविंदांचा उत्साह पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली. त्यांच्या सहभागाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

**ढोल-ताशांचा दणदणाट; डीजेच्या तालावर तरुणाईचा जल्लोष-** 'संगमनेरी तांडव ढोल-ताशा पथक' आणि 'विघ्नहर्ता बिट्स'च्या पारंपरिक वाद्यांच्या जुगलबंदीने वातावरणात उत्साह निर्माण केला. त्यानंतर पुण्याच्या प्रसिद्ध डीजे नीच्या संगीताच्या तालावर तरुणाईने मोठा जल्लोष केला. यावेळी स्थानिक रील स्टार्स, उत्कृष्ट व्हिडिओ निर्मिती करणारे तसेच वैशिष्ट्यपूर्ण पारंपरिक वेशभूषा साकारणाऱ्या स्पर्धकांचा मंचावर विशेष बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला.



हा भव्य दहीहंडी उत्सव यशस्वी करण्यासाठी हिंदु राष्ट्र शक्ती संघाचे संस्थापक अध्यक्ष सचिन सुरेश कानकाटे यांच्या नेतृत्वाखाली संघाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. शहर व परिसरातील हजारो नागरिक, महिला आणि युवकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे दहीहंडी उत्सवाला उत्साहाचे आणि जल्लोषाचे स्वरूप प्राप्त झाले.

# उमाजी नाईक यांचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवा - आ. खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांनी ब्रिटिशांविरुद्ध संघर्ष करताना छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पराक्रम गाजविला. त्यांच्या शौर्याचा आणि देशासाठीच्या योगदानाचा इतिहास कधीही विसरता येणार नाही. ब्रिटिशांमध्येही उमाजी नाईक यांच्या पराक्रमाची धास्ती होती. अशा महान व्यक्तिमत्त्वांचा इतिहास आणि त्यांचे योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.



संगमनेर तालुक्यातील सावरगाव तळ, गणेशवाडी आणि पेमगिरी येथे आद्यक्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीच्या निमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये बोलताना आमदार खताळ म्हणाले, कि धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्या समन्वयातून खऱ्या अर्थाने समाजाचा विकास झाला पाहिजे.संत-महंतांचे आशीर्वाद आणि ग्रामस्थांचे प्रेम यामुळे मला लोक प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. पुढील काळात ही तुमचा भाऊ आणि तुमचा मुलगा म्हणून तुमच्या सुख-दुःखात सदैव सहभागी राहीन, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमास ग्रामस्थ, भाविक, तरुण मंडळी, महिला तसेच महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक मित्र मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संगमनेर तालुक्यातील पेमगिरी येथील शहागडाच्या ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या विकासासाठी पर्यटन विभागाचे मंत्री तसेच संबंधित अधिकाऱ्यांसमोर सादरीकरण करण्यात येणार आहे. शहागडाचा ऐतिहासिक वारसा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. ग्रामस्थांच्या सहकार्याने आणि आशीर्वादाने या परिसराचा विकास करण्यासाठी माझ्याकडून कोणतीही कमतरता पडू देणार नाही.

# नान्नज विद्यालयात शिक्षकदिन उत्साहात साजरा

युवावार्ता (प्रतिनिधी)

नान्नज दुमाला - नान्नज दुमाला येथील श्री संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालयात मुख्याध्यापक एच. आर. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या अभिनव उपक्रमातून दहावीच्या साठ विद्यार्थ्यांना शिक्षकांची भूमिका प्रत्यक्ष अनुभवण्याची तसेच शालेय कामकाजाची विविध अंगांनी ओळख करून घेण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाच्या आरंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक एच आर सोनवणे व विद्यार्थी मुख्याध्यापक आदित्य ढोणे व सहकाऱ्यांनी केले. कार्यक्रमाचे




प्रास्ताविक कार्तिकी फुलसुंदर हिने केले.

विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, क्रीडा शिक्षक, कलाशिक्षक तसेच शिपाई अशा विविध भूमिका प्रभावीपणे पार पाडल्या. विद्यार्थ्यांनी विविध विषयांचे तास घेऊन अध्यापनाचा अनुभव घेतला. त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणातून नेतृत्वगुण, संवादकौशल्य, नियोजनक्षमता व जबाबदारीची जाणीव दिसून आली.

विद्यार्थी मुख्याध्यापक म्हणून आदित्य ढोणे, उपमुख्याध्यापिका म्हणून कार्तिकी फुलसुंदर, पर्यवेक्षक म्हणून कार्तिक भडकवाड व अर्पिता वाळुंज यांनी शाळेचे दैनंदिन कामकाज अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने पाहिले. क्रीडा शिक्षक म्हणून शंतनू नेटके व प्राची रामकर यांनी क्रीडाशिक्षकांची जबाबदारी सांभाळली. तसेच कलाशिक्षिका म्हणून सृष्टी झाडगे, शितल फड व स्वप्नाली सानप यांनी फलकलेखन, सजावट व इतर कलाविषयक कामकाज उत्साहाने पूर्ण केले.

# मातृदिन : बैलपोळ्याच्या निमित्ताने संस्कृती आणि कृतज्ञतेचा जागर

आज हिंदू संस्कृतीच्या दृष्टीने खऱ्या अर्थाने मातृदिन आहे. हा दिवस म्हणजेच बैलपोळा. भारतीय संस्कृती ही केवळ मानवकेंद्री नसून निसर्ग आणि प्राणिमात्रांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी संस्कृती आहे. म्हणूनच आपण नागपंचमी, वसुबारस, कोकिळाव्रत आणि बैलपोळा असे सण मोठ्या श्रद्धेने साजरे करतो.

यंदाच्या पोळा सणावर मात्र दुष्काळाचे सावट आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांत अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. बळीराजा आभाळाकडे डोळे लावून पावसाची वाट पाहत आहे. अशा कठीण परिस्थितीतही वर्षातून एकदा येणारा बैलपोळा सण शेतकरी आपल्या परीने उत्साहाने साजरा करतो. अडचणी कितीही असल्या तरी आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या बैलाबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याची परंपरा तो जपतो. बैलपोळा म्हणजेच पिठोरी अमावस्या. या दिवशी स्त्रिया पिठोरी व्रत करतात. सौभाग्य, पुत्र-पुत्रीचे सुख आणि कुटुंबाचे कल्याण लाभावे, यासाठी हे व्रत केले जाते. स्त्रीच्या मातृत्वाचा गौरव करणारी ही अमावस्या आहे.

पिठोरी व्रताशी संबंधित एक कथा भविष्यपुराणात सांगितली आहे. एका स्त्रीचा पुत्र मृत जन्माला आला. तिने वनात जाऊन योगिनींना प्रसन्न केले



आणि आपल्या पुत्राला जीवनदान मिळावे, अशी प्रार्थना केली. तिची प्रार्थना फळाला आली आणि योगिनींच्या आशीर्वादाने तिचा पुत्र जिवंत झाला. या कथेचा अर्थ केवळ पुत्रप्राप्ती एवढाच नाही. पुत्र जन्माला येणे महत्त्वाचे आहेच; पण तो संस्कारी, गुणवान, उत्साही आणि समाजासाठी उपयुक्त असा असणे त्याहून महत्त्वाचे आहे.

ज्याच्यामध्ये उत्साह नाही, ज्याच्यामुळे आनंद निर्माण होत नाही किंवा ज्याच्या जन्माने शत्रूलाही आनंद होतो, असा पुत्र नको; शंभर मूर्ख मुलांपेक्षा एक गुणवान पुत्र श्रेष्ठ असतो, हा संस्कार आपल्या संस्कृतीने दिला आहे.

आई ही केवळ मुलाला जन्म देणारी नसते; ती संस्कारांची जननी असते. भारतीय संस्कृतीने मातेला सर्वोच्च स्थान देत 'मातृदेवो भव' असे सांगितले आहे. आई म्हणजे सतत वाहणारा प्रेमाचा झरा. तिच्या संस्कारातून व्यक्तिमत्त्व घडते आणि तिच्या त्यागातून कुटुंब, समाज आणि राष्ट्राची जडणघडण होते.

भारतीय संस्कृती अनेक वीरमातांनी समृद्ध केली आहे. आपल्या देशाला 'भारत' हे नाव ज्या भरताच्या नावावरून मिळाले, त्या भरताने लहानपणी सिंहाचे तोंड फाडून त्याचे दात मोजण्याचे धाडस दाखविले. अशा पराक्रमी भरताला जन्म देणाऱ्या शकुंतलेला प्रणाम. प्रभू श्रीराम आणि भगवान श्रीकृष्ण यांना जन्म देणाऱ्या कौसल्या आणि देवकी मातांना नमन. हिंदवी स्वराज्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांसारखा युगपुरुष घडविणाऱ्या राजमाता जिजाऊंना शतशः प्रणाम.

ज्यांनी पराक्रमी पुत्रांना जन्म दिला आणि भारतमातेचे मस्तक सदैव उंच ठेवले, त्या सर्व वीरमातांना आजच्या मातृदिनानिमित्त शतशः नमन!

आपली संस्कृती वीरमातेनंतर राजमाता, गुरुमाता, राष्ट्रमाता आणि संस्कृतीमातेकडेही मातृभावाने पाहते. या सर्व मातांमध्ये दैवत्व अनुभवत गेल्यावर शेवटी प्रत्यक्ष परमेश्वराचेच मातृरूप जाणवणे, ही भक्तीची सर्वोच्च अवस्था आहे. म्हणूनच संत ज्ञानेश्वरांनी 'विठाई माऊली माझी' असे म्हटले. आईमध्येच भगवंताचे दर्शन घेणे, हीच आपल्या संस्कृतीची शिकवण आहे.

भारतीय संस्कृती कृषिप्रधान आहे. या संस्कृतीने मनुष्याचा गौरव, निसर्गाचा गौरव आणि प्राणिमात्रांचा गौरव केला आहे. म्हणूनच नागपंचमी, वसुबारस, कोकिळाव्रत आणि पोळा असे सण आपल्या परंपरेत आले. बैलपोळा हा केवळ एक सण नाही; तो वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. आज यंत्रयुग आले असले तरी ग्रामीण जीवनात बैलाचे महत्त्व अद्याप कमी झालेले नाही. वर्षभर शेतकऱ्याबरोबर शेतात राबणाऱ्या बैलाला या दिवशी सजवले जाते. त्याला आंघोळ घालून, रंगरंगोटी करून, शिंगांना रंग देऊन, गळ्यात घुंगरांच्या माळा घालून त्याची पूजा केली जाते. शेतकरी आपल्या लाडक्या बैलाला मानाचे स्थान देतो. यंदा पावसाने पाठ फिरवली असली, शेतीसमोर अनेक संकटे उभी असली, तरी शेतकरी आपल्या बैलाला सजवण्यासाठी मागेपुढे पाहत नाही. बाजारपेठेत बैलांच्या सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठी शेतकरी गर्दी करत आहेत. त्यातूनच प्राणिमात्रांबद्दलची कृतज्ञता आणि आपुलकी दिसून येते.

अनेक शेतकरी आजही अभिमानाने म्हणतात, आमची बैलजोडी आम्ही सजवली; पण पावसाने वाट लावली. तरीही या संकटातूनही मार्ग काढत शेतकरी आनंदाने पोळा साजरा करतो. कारण त्याच्यासाठी हा केवळ उत्सव नसतो; हा त्याच्या कष्टकरी साथीदाराप्रती प्रेम, आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असतो.

म्हणूनच बैलपोळा हा प्राणीगौरवाचा, मातृगौरवाचा आणि भारतीय संस्कृतीतील कृतज्ञतेचा सण आहे. पुढील पिढीला या सणांचे केवळ विधी नव्हे, तर त्यामागील संस्कार आणि जीवनमूल्येही आपण सांगितली पाहिजेत.

मातेचा गौरव करूया, प्राणिमात्रांप्रती कृतज्ञता व्यक्त करूया आणि आपल्या भारतमातेचा गौरव सदैव उंचावत ठेवूया. हाच खऱ्या अर्थाने बैलपोळ्याचा आणि मातृदिनाचा संदेश आहे.

# जैन पर्व पर्युषण



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जैन धर्मीयांचे पवित्र आणि आत्मशुद्धीचा संदेश देणारे पर्युषण पर्व दि. ८ सप्टेंबर २०२६ पासून सुरू झाले असून, दि. १५ सप्टेंबर रोजी क्षमापना दिवसाने या पर्वाची सांगता होणार आहे. संपूर्ण भारतभर जैन बांधवांकडून हे पर्व धार्मिक व आध्यात्मिक वातावरणात मोठ्या उत्साहाने साजरे केले जाते.

संगमनेरमध्येही पर्युषण पर्वानिमित्त विविध धार्मिक व आध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने पुण्याहून स्वाध्यायी सौ. शारदाजी चोरडिया तसेच औरंगाबादहून सौ. पद्माबाई झांबड या वर्धमान जैन स्थानक येथे आल्या आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज सकाळी प्रवचनाचे आयोजन करण्यात येत असून, संगमनेर शहरातील जैन समाजबांधव मोठ्या संख्येने या प्रवचनांचा लाभ घेत आहेत. पर्युषण पर्वाच्या निमित्ताने श्रावक-श्राविकांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण असून, धार्मिक उपक्रमांमध्ये सर्वजण मोठ्या श्रद्धेने सहभागी होत आहेत. आत्मचिंतन, संयम, क्षमा आणि सद्विचारांचा संदेश देणाऱ्या या पर्वाला संगमनेरमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

दरम्यान, पर्युषण पर्वानिमित्त दि. १० व ११ सप्टेंबर रोजी सायंकाळी ८.१५ ते ९ वाजेपर्यंत 'ऐका आई-बाबा' या विषयावर पालकांसाठी विनाशुल्क कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. पालकत्व, मुलांशी संवाद आणि कुटुंबातील नातेसंबंध याबाबत मार्गदर्शन करणारी ही कार्यशाळा सर्वांसाठी खुली ठेवण्यात आली आहे.

# संपादकीय...

## कार्यालये जनतेच्या सेवेसाठी, मग नागरिकांची फरफट का?

लोकशाही व्यवस्थेत सरकार आणि प्रशासन यांचा अंतिम केंद्रबिंदू एकच असतो-सामान्य नागरिक. नागरिकांच्या करातून सरकारी यंत्रणा चालते, त्याच नागरिकांच्या सुविधांसाठी विविध कार्यालये उभी केली जातात आणि नागरिकांची कामे सुलभ, पारदर्शक व वेळेत व्हावीत, हीच प्रशासनाची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक सरकारी कार्यालयांमध्ये नागरिकांना मिळणारा अनुभव याच्या अगदी उलट असल्याचे चित्र वारंवार दिसते. एका साध्या कामासाठी अर्ज करायचा, कागदपत्रे द्यायची आणि त्यानंतर सुरू होतो तो 'हेलपाट्यांचा प्रवास'! 'आज साहेब नाहीत', 'उद्या या', 'ही कागदपत्रे अपुरी आहेत', 'वरिष्ठांची सही लागेल', 'फाईल पुढे गेली आहे', 'सिस्टम बंद आहे', 'ऑनलाइन अर्ज करा', 'ऑनलाइन होत नाही, ऑफलाइन द्या'-अशा कारणांची मालिका सामान्य नागरिकाच्या वाट्याला येते. काम नेमके कुठे अडले आहे, कधी होणार आहे आणि त्यासाठी आणखी काय आवश्यक आहे, याचे स्पष्ट उत्तर मिळत नाही. परिणामी एकाच कामासाठी नागरिकाला वारंवार कार्यालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागतात. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांची परिस्थिती अधिक कठीण आहे. तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या सरकारी कार्यालयात एखादे प्रमाणपत्र, दाखला, महसूलविषयक काम, जमीन नोंद, शासकीय योजनेचा लाभ, पेन्शन किंवा अन्य प्रशासकीय कामासाठी नागरिकांना दूरवरून यावे लागते. प्रवासाचा खर्च, कामाचा बुडालेला दिवस आणि त्यात कार्यालयातील अनिश्चितता-या सगळ्याचा आर्थिक व मानसिक भार सामान्य माणसावर पडतो. ज्याच्याकडे वेळ आणि पैसा दोन्ही कमी आहेत, त्याच्यासाठी सरकारी कार्यालयाचा एक फेरा म्हणजे केवळ प्रवास नसतो; तो त्याच्या रोजच्या संसारावरचा अतिरिक्त ताण असतो. प्रशासनाचे डिजिटलायझेशन झाले, ऑनलाइन सेवा सुरू झाल्या, नागरिकांच्या कामासाठी विविध पोर्टल्स उपलब्ध झाली, तरीही 'ऑनलाइन' आणि 'ऑफलाइन' यांच्यातील दरी कायम असल्याचे अनेकदा जाणवते. ऑनलाइन अर्ज केल्यानंतरही कागदपत्रांची प्रत घेऊन कार्यालयात जाणे, पडताळणीसाठी पुन्हा उपस्थित राहणे आणि त्यानंतर फाईलची स्थिती जाणून घेण्यासाठी कार्यालयाच्या फेऱ्या मारणे, असे होत असेल तर डिजिटल प्रशासनाचा नेमका फायदा कोणाला? खरे तर तंत्रज्ञानाचा उद्देश नागरिकांचा वेळ वाचवणे हा असायला हवा. नागरिकाने कार्यालयात जाण्याची गरज कमी व्हावी, कार्यालयाने नागरिकाला वारंवार बोलावण्याची गरज निर्माण होऊ नये, ही डिजिटल प्रशासनाची खरी कसोटी आहे. केवळ संगणक, पोर्टल आणि ऑनलाइन अर्ज सुरू केल्याने प्रशासन डिजिटल होत नाही; नागरिकाचे काम प्रत्यक्षात किती सहज झाले, हे महत्त्वाचे आहे. यातील आणखी एक गंभीर प्रश्न म्हणजे उत्तरदायित्वाचा अभाव. एखादे काम कोणत्या अधिकाऱ्याकडे आहे, त्याची अंतिम मुदत काय आहे आणि विलंब झाल्यास जबाबदार कोण, याची स्पष्ट माहिती नागरिकाला मिळायला हवी. प्रत्येक शासकीय सेवेसाठी निश्चित कालमर्यादा असताना त्या कालमर्यादेचे पालन होते की नाही, यावर नियमित देखरेख असणे आवश्यक आहे. 'फाईल प्रलंबित आहे' हे उत्तर पुरेसे नाही. फाईल का प्रलंबित आहे, हे सांगण्याची जबाबदारीही प्रशासनाचीच असली पाहिजे. याचा अर्थ सर्वच सरकारी कर्मचारी किंवा अधिकारी निष्क्रिय आहेत, असा अजिबात नाही. अनेक अधिकारी-कर्मचारी मर्यादित मनुष्यबळात मोठ्या जबाबदाऱ्या पार पाडत आहेत. मात्र काही ठिकाणी निर्माण झालेली कामकाजातील उदासीनता आणि नागरिकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन संपूर्ण यंत्रणेची प्रतिमा खराब करतो. नागरिक हा 'उपकार मागणारा' नसून शासनाचा हक्काचा सेवाग्राही आहे, ही भावना प्रत्येक कार्यालयात रुजणे गरजेचे आहे. सरकारी कार्यालयात येणारा वृद्ध, महिला, दिव्यांग, शेतकरी किंवा रोजंदारीवर काम करणारा नागरिक यांच्यासाठी स्वतंत्र मदत कक्ष, स्पष्ट सूचना फलक, टोकन व्यवस्था, ऑनलाइन अर्जाची प्रत्यक्ष मदत आणि तक्रारींचे वेळबद्ध निराकरण अशा सुविधा सहज उपलब्ध करून देता येतात.

# एसएमबीटी शैक्षणिक संकुलात 'द कार्डियाक सर्किट' क्रीडा स्पर्धा उत्साहात

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - एसएमबीटी कॉलेज ऑफ फिजिओथेरेपीच्या वतीने 'जागतिक फिजिओथेरेपी दिना'चे औचित्य साधून 'द कार्डियाक सर्किट - रेस फॉर एव्हरी बीट' या विशेष क्रीडा स्पर्धेचे आयोजन एसएमबीटी क्रीडा मैदानावर अत्यंत उत्साहात पार पडले. दैनंदिन आयुष्यात हृदयाचे आरोग्य जपणे, हृदयरोग प्रतिबंध, व्यवस्थापन आणि पुनर्वसन याविषयी विद्यार्थी व समाजात व्यापक जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याची माहिती प्राचार्य डॉ. उज्वल येवले यांनी दिली.



ते म्हणाले, या क्रीडा महोत्सवात एसएमबीटी शैक्षणिक संकुलातील विविध महाविद्यालयांच्या शेकडो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धेत 'मॅरेथॉन रेस' आणि '७ सदस्यांची रिले शर्यत अशा दोन मुख्य प्रकारांचा समावेश होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या दोन्ही स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कौशल्य आणि सांघिक कामगिरीचे प्रदर्शन करत एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अँण्ड च्या संघाने दोन्ही प्रकारांत प्रथम क्रमांक पटकावून 'दुहेरी अजिंक्यपद' आपल्या नावावर कोरले.

स्पर्धेचे उद्घाटन संकुलातील विविध महाविद्यालयांच्या प्रमुखांच्या हस्ते मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. याप्रसंगी एसएमबीटी कॉलेज ऑफ फिजिओथेरेपीचे प्राचार्य डॉ. उज्वल येवले, एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ डेन्टल सायन्सचे अधिष्ठाता डॉ. महेश गाभणे, एसएमबीटी कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. योगेश उशीर, एसएमबीटी आयुर्वेद कॉलेज आणि हॉस्पिटलच्या प्राचार्या डॉ. शिल्पा बढे तसेच एसएमबीटी नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या डॉ. कविता मातेरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्पर्धेच्या समाप्तीनंतर आयोजित पारितोषिक वितरण समारंभात मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघांना व खेळाडूंना आकर्षक रोख पारितोषिके आणि स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. उज्वल येवले यांनी निरोगी हृदयासाठी नियमित व्यायाम आणि खेळांचे असणारे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फिजिओथेरेपी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# रंगभरण स्पर्धेत मालपाणी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - डॉ. देवेंद्र ओहरा स्मृती दिनानिमित्त संग्राम परिवार, संगमनेर यांच्या वतीने क्रीडा संकुल येथे आयोजित तालुकास्तरीय रंगभरण स्पर्धेत मालपाणी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

इयत्ता ५वी-६वी गटात स्लेशा रवींद्र गवळी हिने तृतीय क्रमांक, ७वी-८वी गटात पियुष भागवत घुले याने तृतीय क्रमांक, तर स्वरा सोमनाथ ताजणे हिने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. ९वी-१०वी गटात श्रद्धा ब्रजेशकुमार यादव हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. श्रेया बाबाजी फटांगरे, आदिश्री भारत कोकाटे, प्रेरणा सचिन भुतकर व रुचिका रवींद्र गवळी यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले.

दरम्यान, गीता परिवार आयोजित रंगभरण स्पर्धेतही मालपाणी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान कामगिरी केली. ६ वी-७ वी गटात सक्षम ब्रिजेशकुमार यादव प्रथम, आराध्या सुनील हासे द्वितीय व सुयश प्रवीण घुले तृतीय ठरले. ७वी-८वी गटात स्वरा सोमनाथ ताजणे प्रथम, स्वामिनी विजय कासार द्वितीय व स्वरा विजय पवार हिने तृतीय क्रमांक मिळविला.

या यशस्वी विद्यार्थ्यांना कलाशिक्षक संतोष गोरे व आप्पासाहेब मिंडे यांचे मार्गदर्शन लाभले. विजेत्यांचे संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पर्यवेक्षिका रंजना पवार, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन केले.

# मुक्तसंचार गोठा व दूध काढणी यंत्रासाठी अनुदान योजना

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - पशुपालकांच्या दुग्ध व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन दूध उत्पादन वाढविणे, पशुधनाची योग्य निगा राखणे तसेच पशुपालकांचा वेळ व श्रम वाचविण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत जिल्हा परिषद सेस निधीमधून मुक्तसंचार गोठा आणि दूध काढणी यंत्रासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे.

मुक्तसंचार गोठ्याच्या माध्यमातून जनावरांना मोकळ्या व हवेशीर वातावरणात ठेवण्याची सुविधा उपलब्ध होणार असून, पशुधनाच्या आरोग्य व व्यवस्थापनामध्ये सुधारणा होण्यास मदत होणार आहे. मुक्त संचार गोठा उभारणीसाठी जिल्हा परिषद सेस निधीमधून ५० टक्के किंवा रु २००००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान देण्यात येणार आहे. तसेच दुध व्यवसायातील श्रम कमी करण्यासाठी दूध काढणी यंत्र खरेदीसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यसामध्ये जिल्हा परिषद सेस निधीमधून ६० टक्के किंवा रु १५०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान देण्यात येणार आहे.

या आधुनिक सुविधांमुळे दूध काढण्याची प्रक्रिया अधिक स्वच्छ, सुलभ व वेळेची बचत करणारी होण्यास मदत होणार आहे. पुशपालकांनी संबंधित योजनेची माहिती व अर्ज करण्यासाठी नजीकच्या पशुवैद्यकीय चिकित्सलयाशी संपर्क साधावा. वरील योजनाचे अर्ज नजीकच्या पशुवैद्यकीय चिकित्सलायामार्फत दि. २४ सप्टेंबर २०२६ पर्यंत स्वीकारण्यात येतील. तरी पशुपालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर मार्फत आवाहन करण्यात येत आहे.

## प्रतिज्ञापत्र

कै. कासम हसन सय्यद रा. खरशिंदे, ता. संगमनेर हे २५/०८/२०२६ रोजी मयत झाले असून त्यांच्या नावावर असलेली अॅपे रिक्षा वाहन क्र. MH 17 By 5804 हे मुन्नाबी कासम सय्यद यांच्या नावावर करण्यात येणार आहे. कुणास काही हरकत असल्यास पुढील आठ दिवसात हरकत द्यावी.

मोबा. - ७८७५९५७२८३


आकर्षक पगारावर जागा भरणे आहे
सुपरवायझर
पूर्णवेळ [पुरुष] : ०२ पदे
शैक्षणिक पात्रता: १२वी / आयटीआय उत्तीर्ण
(स्वतःची टु व्हिलर असणे अवश्यक)
ऑफिस असिस्टंट
अर्धवेळ [पुरुष / महिला]
शैक्षणिक पात्रता: १०वी / १२वी उत्तीर्ण
- संपर्क -
उमंग इन्फ्राटेक
7875455777

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

पाहिजेत
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजेत
पत्ता – तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, संगमनेर
9860989807
9422225947

फ्लॅट विकणे आहे
- ठिकाण-
दिघी, पुणे, आळंदी रोड, पर्पल ब्लुम सोसायटी, साई पार्क रोड, प्लॉट नं. सी-108
क्षेत्रफळ - 585, फुली फर्निचर, 1 बीएचके 80 स्क्वे फुट बाल्कणी
किचन ट्रॉली, बेड, सोफा, टिव्ही युनिट
8379064040
9960984718

FinanCity
STOP THINKING, START INVESTING
उत्कृष्ट करिअर संधी तुमच्यासाठी !
उत्तम संधी, उत्तम करिअर आणि उज्वल भविष्य तुमच्या प्रतीक्षेत आहे
१२ सप्टेंबरपर्यंत मुलाखत सुरू आहे
बँक ऑफिस - २५ जागा (महिला)
डेटा एन्ट्री व डॉक्युमेंटेशन रिपोर्ट तयार करणे, ऑफिस सपोर्टची कामे
पात्रता - कोणत्याही शाखेतील पदवीधर
ॲडमिन / एचआर - २ जागा (महिला)
प्रशासकीय कामे, कर्मचारी समन्वय, एचआर संबंधित कागदपत्रे
पात्रता- कोणत्याही शाखेतील पदवीधर
फिल्ड वर्क सेल्स मॅनेजर- ५ जागा (पुरुष)
फिल्ड भेटी व ग्राहक संपर्क, नवीन ग्राहक जोडणे, सेल्स टार्गेट पूर्ण करणे
पात्रता- कोणत्याही शाखेतील पदवीधर
FINANCITY सोबत करिअर का घडवावे?
आकर्षक पगार व कमिशन,करिअर मध्ये वाढीच्या संधी, मैत्रीपूर्ण कामाचे वातावरण, स्थैर्य आणि सुरक्षित भविष्य, परफॉर्मन्सवर आधारित प्रोत्साहन
अधिक माहितीसाठी संपर्क करा
7208095977 / 9623532907
फायनान्स सिटी, नेअर ग्रेव्ही यार्ड हॉटेल, अकोले बायपास रोड, संगमनेर

पाहिजेत
सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क– जाधव सोनोग्राफी सेंटर
मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

पाहिजेत
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846


## CHANGE IN NAME

I Lucky Rajesh Athwal At/Po.Sangamner, Tal- Sangamner, do hereby solemnly affirm & state as under: That my true and correct name is Lucky Rajesh Athwal and the same is recorded on my Aadhaar Card but my Marksheet & Certificate However on given as My Name Laki Rajesh Aathwal That both the Names Lucky Rajesh Athwal & Laki Rajesh Aathwal refer to one and the same Person.


पाहिजेत
ऑफिस बॉय (प्युन)
शिक्षणास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान,
स्वत:चे वाहन आवश्यक
- संपर्क -
8378956909
8459199913
बायोडाटा पाठवा

पाहिजेत
मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल
नवीन नगर रोड, ताजने मळी, संगमनेर
- संपर्क -
9921245753

जागा विकणे आहे
अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
एजंट स्वागत
- संपर्क -
9890468212

पाहिजेत
सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

भाड्याने देणे आहे
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818



SR THORAT JOB GAGANGIRI

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar
Mobile Number – 9860100936/937
Sent the CV Following E-Mail Id:
admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com





## संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. डॉ. प्रतिक वाणी रा. नविन नगर रोड, ता. संगमनेर, जि. अ.नगर म्यु.घ.नं. -, सि. स. नं. Plot No -3 स.नं. १४८/८/४ या ठिकाणी मध्ये वाणी- नर्सिंगहोम व मॅटरनिटी होम चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. ०९/०९/२०२६ मुख्याधिकारी – संगमनेर नगरपरिषद, संगमनेर


नोकरीची सुवर्णसंधी
श्री गणेश टायर्स
अकाऊंटंट - १
टॅली, जीएसटी ज्ञानास प्राधान्य
सेल्स एक्झीक्युटिव्ह - १
बॅटरी व इंजिन ऑईलच्या विक्री क्षेत्रातील अनुभव
अनुभावानुसार आकर्षक पगार
पत्ता - तीन बत्ती चौक, संगमनेर
८९९१८६२७५१

पाहिजेत
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

# नाशिकच्या छोट्याशा खोलीतून IPO लिस्टींग पर्यंत

## ESDS ची २१ वर्षांची प्रेरणादायी भरारी




नाशिकच्या मातीतून सुरु झालेल्या एका छोट्याशा स्वप्नाने आज NSE आणि BSEवर सूचीबद्ध होण्याचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. ESDS Software Solution Ltd. ची 21 वर्षांची वाटचाल ही केवळ एका तंत्रज्ञान कंपनीच्या यशाची कहाणी नाही, तर दूरदृष्टी, सातत्य, स्वदेशी तंत्रज्ञानावरील विश्वास आणि




भारतीय उद्योजकतेच्या सामर्थ्याची प्रेरणादायी गाथा आहे.2005 मध्ये स्थापन झालेल्या ESDSने सुरुवातीपासूनच भारताच्या डिजिटल भविष्यासाठी देशांतर्गत तंत्रज्ञान आणि डिजिटल पायाभूत सुविधा उभारण्याचा विचार केंद्रस्थानी ठेवला. आज कंपनी AI-enabled end-to-end IT service provider म्हणून कार्यरत असून क्लाऊड, डेटा सेंटर, मॅनेज्ड सर्व्हिसेस आणि AI इन्फ्रास्ट्रक्चरच्या माध्यमातून सरकार, सार्वजनिक क्षेत्र, बँकिंग संस्था आणि विविध उद्योगांना सेवा देत आहे. एका वडिलांचा विश्वास... स्वप्नाला मिळालेली पहिली ताकदESDSच्या प्रवासामागे एक भावनिक आणि प्रेरणादायी कथा आहे. संस्थापक पियुष प्रकाशचंद्र सोमाणी – अध्यक्ष, प्रवर्तक व व्यवस्थापकीय संचालक यांच्या सुरुवातीच्या प्रवासात त्यांच्या वडिलांनी पहिला कॉम्प्युटर आणि इंटरनेट कनेक्शन घेण्यासाठी मदत केली. ही मदत केवळ आर्थिक नव्हती; ती एका वडिलांनी आपल्या मुलाच्या स्वप्नावर ठेवलेली विश्वासाची पहिली गुंतवणूक होती. याच विश्वासातून सुरु झालेला प्रवास पुढे ग्राहक, कर्मचारी, भागीदार आणि गुंतवणूकदारांच्या विश्वासाने अधिक मजबूत होत गेला.E S D S च्या अधिकृत माहितीनुसार, पियुष सोमाणी यांनी कंपनीची स्थापना करताना भारतातील डिजिटल महत्त्वाकांक्षेला चालना देणारे स्वदेशी तंत्रज्ञान आणि डिजिटल पायाभूत सुविधा उभारण्याचा संकल्प केला. आज त्याच विचाराचा विस्तार indigenous cloud, AI-enabled platforms आणि डिजिटल transformation solutionsपर्यंत झाला आहे. पियुष सोमाणी यांच्या नेतृत्वातून आकाराला आलेली वाटचालनाशिकमधून सुरु झालेल्या कंपनीला देशाच्या डिजिटल परिवर्तनाशी जोडण्यासाठी पियुष सोमाणी यांचे नेतृत्व आणि दीर्घकालीन तंत्रज्ञानविषयक दृष्टी महत्त्वाची ठरली. संशोधन व विकासावर भर देत ESDSने स्वतःच्या क्लाऊड क्षमता, AI-आधारित तंत्रज्ञान आणि विविध स्वदेशी तंत्रज्ञान उपाय विकसित केले आहेत. आज ESDSची डिजिटल पायाभूत सुविधा विविध क्षेत्रांतील महत्त्वाच्या कामकाजाला आधार देत आहे. कंपनीच्या अधिकृत माहितीनुसार तिच्याकडे भारतातील विविध ठिकाणी Tier-III डेटा सेंटरची सुविधा असून सरकार, वित्तीय संस्था आणि उद्योगांसाठी mission-critical infrastructure उपलब्ध करून दिले जाते. कोमल सोमाणी यांचेही महत्त्वपूर्ण योगदानया प्रवासात कोमल पियुष सोमाणी – पूर्णवेळ संचालक, मुख्य विपणन अधिकारी आणि मुख्य मानव संसाधन अधिकारी यांची भूमिकाही महत्त्वाची आहे. कंपनीची बाजारपेठेतील ओळख, ब्रँड, ग्राहकांशी संबंध आणि सक्षम मनुष्यबळ व कार्यसंस्कृती




निर्माण करण्याच्या प्रक्रियेत त्यांचे योगदान राहिले आहे. ESDSच्या अधिकृत Investor Relations माहितीतही त्यांच्या या पदांची नोंद आहे. NSE-BSE Listing : यशासोबत वाढलेली जबाबदारीESDSच्या प्रवासातील सर्वात महत्त्वाच्या अलीकडील टप्प्यांपैकी एक म्हणजे IPO आणि NSE-BSEवरील सूचीबद्धता. सप्टेंबर 2026 मध्ये कंपनीच्या समभागांची बाजारात नोंद झाली. IPOला मिळालेला मोठा प्रतिसाद आणि त्यानंतर झालेली दमदार सुरुवात ही कंपनीबद्दल गुंतवणूकदारांच्या अपेक्षा आणि विश्वास अधोरेखित करणारी ठरली. मात्र Listing हा ESDSसाठी केवळ उत्सवाचा क्षण नसून नव्या जबाबदारीची सुरुवात आहे. सार्वजनिक कंपनी म्हणून ग्राहक, कर्मचारी, भागधारक आणि गुंतवणूकदारांचा विश्वास अधिक मोठ्या जबाबदारीने जपण्याचे आव्हान आता कंपनीसमोर आहे.भारताच्या डिजिटल भविष्यासाठी स्वदेशी तंत्रज्ञानाचा ध्यासआज भारत डिजिटल अर्थव्यवस्थेच्या दिशेने वेगाने पुढे जात आहे. अशा वेळी क्लाऊड, AI, डेटा सेंटर, सायबर सुरक्षा आणि डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर या क्षेत्रांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. ESDSची भूमिका याच व्यापक परिवर्तनाशी जोडलेली आहे. कंपनी स्वतःला “Built on Indian soil, governed by Indian laws, powered by Indian engineering” या विचाराशी जोडते. स्वदेशी तंत्रज्ञान निर्माण करणे, भारतीय संस्थांसाठी सुरक्षित आणि सक्षम डिजिटल पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि भारताच्या तंत्रज्ञान क्षमतेला जागतिक स्तरावर नेणे, हा या प्रवासाचा व्यापक दृष्टिकोन आहे.संगमनेरकरांसाठीही अभिमानाचा क्षणESDSच्या यशात संगमनेरकरांसाठी विशेष अभिमानाची बाब आहे. कंपनीचे संस्थापक पियुष प्रकाशचंद्र सोमाणी यांनी अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर येथून इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले आहे. संगमनेरच्या शैक्षणिक वातावरणातून घडलेला विद्यार्थी पुढे तंत्रज्ञान क्षेत्रात उद्योजक म्हणून स्वतःची ओळख निर्माण करतो आणि त्याच कंपनीचा प्रवास NSE-B S E पर्यंत पोहोचतो, ही निश्चितच संगमनेरकरांसाठी अभिमानाची बाब आहे. स्थानिक पातळीवर घेतलेले शिक्षण, मोठे स्वप्न, तंत्रज्ञानावरील विश्वास आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर यश मिळवता येते, याचे ESDS हे आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरते.




### एक माजी ESDSian आणि अमृतवाहिनीचा विद्यार्थी म्हणून...

**ESDS Software Solution Ltd.च्या या ऐतिहासिक यशाचा एक माजी ESDSian आणि अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी (Alumnus) म्हणून मला मनापासून अभिमान आहे. ESDSमध्ये Linux Associate म्हणून काम करताना या संस्थेच्या कार्यसंस्कृतीचा आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील वाटचालीचा जवळून अनुभव घेण्याची संधी मला मिळाली.ज्या संस्थेने नाशिकमधून एका छोट्याशा सुरुवातीपासून प्रवास सुरू करून आज NSE आणि BSEच्या व्यासपीठावर स्थान मिळवले, त्या संस्थेच्या या यशाशी माझ्याही आठवणी जोडलेल्या आहेत. त्याचबरोबर, पियुष सोमाणी यांच्याप्रमाणेच अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी असल्याचा अभिमान या यशामुळे आणखी द्विगुणित झाला आहे.एक्स-ESDSian आणि अमृतवाहिनीचा Alumni म्हणून ESDSच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!**

**सुदीप किसन हासे**
**संचालक - दैनिक युवावार्ता**
**संचालक - युवा पॉलिप्रिंट अँड पॅकेजिंग इंडस्ट्रिज**

# संगमनेरला रंगणार दहीहंडी, पहिला मान ताईला

## आ. खताळ पाटील युवा मंचचा उपक्रम; तब्बल २ लाख २१ हजारांची पारितोषिके

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने आमदार अमोल खताळ पाटील युवा मंचाच्या वतीने बुधवार दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता दहीहंडी उत्सव पार पडणार आहे. ही दहीहंडी प्रत्येक ताई आणि आईच्या सन्मानासाठी! असा संदेश देत यंदाच्या दहीहंडीचा पहिला मान ताईला देण्यात येणार आहे. या दहीहंडीत एकूण २ लाख २१ हजार रुपयांची पारितोषिके ठेवण्यात आलेली आहेत.



एआय फोटो

दहीहंडी हिंदू अस्मितेची, संगमनेरच्या स्वाभिमानाची या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उत्सवात पारंपरिक दहीहंडीची संस्कृती, गोविंदा पथकांचा थरार, ढोल-ताशांचा गजर आणि संगीताचा जल्लोष असा उत्साहपूर्ण माहोल अनुभवायला मिळणार आहे. विविध गोविंदा पथकांमध्ये दहीहंडी फोडण्यासाठी मोठी चुरस पाहायला मिळणार आहे.`.

आ. खताळ पाटील युवा मंचच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडी उत्सवात महिला गोविंदांचा विशेष सहभाग राहणार आहे. त्याचबरोबर छावा ढोल-ताशा पथक, सात थरांचा भव्य मटकी मनोरा व आकर्षक दहीहंडी सजावट हे उत्सवाचे प्रमुख आकर्षण असणार आहे. या कार्यक्रमात श्री नारायणी साउंड्स, विरभद्र लाईट्स, मोऱ्या इव्हेंट्स आणि डीजे वैभव यांच्या माध्यमातून संगीत, प्रकाश योजना आणि मनोरंजनाची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे दहीहंडीचा पारंपरिक उत्साह आणि आधुनिक मनोरंजनाचा संगम संगमनेरकरांना अनुभवता येणार आहे तरी या दहीहंडी उत्सवाला संगमनेर शहर व तालुक्यातील सर्व माता-भगिनी, गोपाळ भक्त, युवक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे आणि दहीहंडी उत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आमदार अमोल खताळ पाटील युवा मंचच्या वतीने करण्यात आले आहे.

# संग्राम पतसंस्थेचे भरीव योगदान

## स्मारक उभारणीसाठी पाच लाखांची दिली देणगी

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर

संगमनेर शहरातील आर्थिक, सहकार आणि सामाजिक चळवळीत संग्राम नागरी सहकारी पतसंस्थेचे नेहमीच भरीव योगदान राहिले आहे. नैसर्गिक आपत्ती असो अथवा शहराच्या विकासाशी संबंधित उपक्रम, संग्राम पतसंस्था सातत्याने सामाजिक बांधिलकी जपत पुढाकार घेत असल्याचे दिसून आले आहे.

संगमनेर येथील हायटेक बसस्थानकासमोरील जागा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी परिवहन विभागाकडून हस्तांतरित करण्यात आली आहे. या ठिकाणी आगामी काळात भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात येणार आहे. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा, तिरंगा ध्वज आणि शहीद स्मारक उभारण्याचा निर्णय नगरपरिषदेने घेतला आहे. या स्मारकांच्या उभारणीसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला असून, शहराच्या वैभवात भर घालणारी ही स्मारके उभी राहणार असल्याचे आमदार सत्यजित तांबे यांनी सांगितले. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते प्रस्तावित स्मारकांच्या प्रतिमांचे अनावरण करण्यात आले. यावेळी समाजातील दानशूर व्यक्ती, संस्था आणि नागरिकांनी पुढे येऊन आर्थिक मदत केल्यास ही स्मारके आणखी भव्य-दिव्य स्वरूपात उभारता येतील असे आवाहन मान्यवरांनी केले. या आवाहनाला तत्काळ प्रतिसाद देत संस्थेचे संस्थापक डॉ. सुधीर तांबे व चेअरमन यांनी संग्राम नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने तब्बल पाच लाख रुपयांची लोकवर्गणी देऊन शहराच्या विकासासाठी आपला सहभाग नोंदविला. त्यानंतर अनेक नागरिक व संस्थांनी लोकवर्गणीत सहभाग घेत स्मारक उभारणीच्या उपक्रमाला हातभार लावला. सामाजिक बांधिलकी जपत शहराच्या विकासासाठी दिलेल्या या योगदानाबद्दल संग्राम नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ, अधिकारी आणि कर्मचारी यांचे अभिनंदन.

SMFRI'S

**VAMANRAO ITHAPE COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT**

At-Velhale, Post - Rajapur, Tal- Sangamner, Dist- Ahilyanagar
(DTE CODE-5597)
Contact No-9822551002,8888176084

**Advertisement Inviting Application For Admission Against Vacant Seat After CAP Round (ACAP) for A.Y. 2026-27 (First Year & Direct Second Year)**

Application are invited from the aspiring eligible candidates for admission against vacant seats,if any (as per the state CET CELL norms) after Cap rounds in the following programmes

**1) B.Tech Programme- Courses**

**1) Computer Engineering**
**2) Information Technology**
**3) Electronics and Telecommunications**
**4) Artificial Intelligence**
**5) Mechanical Engineering**
**6) Electrical Engineering**

**2) MBA Programme**
**3) MCA Programme**

**Schedule for Admission through Against CAP (ACAP) Vacancy**

| Activity | FY and DSE (B. Tech) | FY MBA & FY MCA |
|---|---|---|
| Display of Vacant Seats at www.ithapecoem.com | 08/09/2026 | 08/09/2026 |
| Invite Applications from registered candidates (Online & Offline) | 08/09/2026 to11/09/2026 | 08/09/2026 to11/09/2026 |
| Display of Provisional Merit List for registered candidates | 11/09/2026 @ 05.00 pm | 11/09/2026 @ 05.00 pm |
| Display of Final Merit List for registered candidates | 11/09/2026 @ 08.00 pm | 11/09/2026 @ 08.00 pm |
| Reporting to Institute for admission confirmation | 12/09/2026 to14/09/2026 | 12/09/2026 to14/09/2026 |
| Cut-off date for admission | 15/09/2026 | 15/09/2026 |

For any details ie. Application form, Schedule, Vacant seats, etc.
Please Visit Our institute website www.ithapecoem.com

पान १ वरून

## पावसाने...

पिण्याच्या पाण्याचे नियोजन, जनावरांसाठी चारा, टँकरची उपलब्धता, वीजपुरवठा, पीक संरक्षण, शेतकऱ्यांना आर्थिक मदत आणि मागील नुकसानीची भरपाई यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांच्या प्रकरणांचा तातडीने निपटारा होणेही गरजेचे आहे.

पावसाचे वेळापत्रक आता बदलत चालले आहे. कधी अतिवृष्टी तर कधी पावसाचा प्रदीर्घ खंड, कधी अवकाळी तर कधी दुष्काळ-निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यालाच बसत आहे. त्यामुळे पारंपरिक मदतीपलीकडे जाऊन हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर दीर्घकालीन जलव्यवस्थापन आणि शेतीसाठी शाश्वत धोरण आखण्याची आवश्यकता आहे.

# ७५३ ग्रामपंचायतींवर दोन दिवसांत नवे प्रशासक !

## मुदत संपलेल्या, निवडणुका रखडलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासकीय राजवट

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यातील मुदत संपलेल्या तसेच विविध कारणांमुळे निवडणुका रखडलेल्या ७५३ ग्रामपंचायतींवर येत्या दोन दिवसांत नव्या प्रशासकांची नियुक्ती होणार असल्याची माहिती समोर आली आहे. ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज ठप्प होऊ नये, नागरिकांना मूलभूत सुविधा सुरळीत मिळाव्यात आणि विकासकामांना प्रशासकीय अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया वेगाने सुरू करण्यात आली आहे.

निवडून आलेल्या ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर या ग्रामपंचायतींचा कारभार कोणाकडे सोपवायचा, याबाबत प्रशासनाकडून गेल्या काही दिवसांपासून हालचाली सुरू होत्या. आता संबंधित विभागांनी प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आणली असून, पुढील दोन दिवसांत ७५३ ग्रामपंचायतींना नवे प्रशासक मिळण्याची शक्यता आहे.

प्रशासकांची नियुक्ती झाल्यानंतर ग्रामपंचायतींचे नियमित प्रशासकीय कामकाज त्यांच्या माध्यमातून सुरू राहणार आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, दिवाबत्ती, रस्ते दुरुस्ती, कर वसुली, ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाज तसेच नागरिकांना आवश्यक असलेल्या विविध सेवा सुरळीत ठेवण्याची जबाबदारी प्रशासकांवर राहणार आहे.

ग्रामपंचायतींच्या सुरू असलेल्या विकासकामांना खीळ बसू नये, यासाठी प्रशासकांना आवश्यक प्रशासकीय अधिकार देण्यात येणार आहेत. त्यामुळे




निवडणुका होईपर्यंत ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकीय यंत्रणेमार्फत चालविला जाणार आहे. दरम्यान, मोठ्या संख्येने ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त होणार असल्याने स्थानिक राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. ग्रामपंचायत निवडणुका रखडल्याने स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणांवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. निवडणुका तातडीने घेऊन ग्रामपंचायतींचा कारभार पुन्हा लोकप्रतिनिधींच्या हाती द्यावा, अशी मागणी ग्रामस्थ आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून होण्याची शक्यता आहे.

निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ७५३ ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकांच्या माध्यमातून चालणार असल्याने आता या नियुक्त्यांकडे संबंधित गावांचे लक्ष लागले आहे.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
• कमी वेदना, जलद बरे होणे
• लेझर व प्रगत तंत्रज्ञान
• अनुभवी जड्ड डॉक्टरांचा सल्ला
• गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

बैल पोळा हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक - दैनिक युवावार्ता, परिवार, संगमनेर



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर

# डीजेच्या दणदणाटाला संगमनेरकरांचा विरोध

## ढोल-ताशे, बँजो, फटाके आणि लेझर किरणांवर नियंत्रणाची मागणी



**डीजेचा दणदणाट नव्हे, उत्सवाचा आनंद महत्त्वाचा!**

**उत्सव हे आनंद, श्रद्धा आणि सामाजिक एकोप्याचे प्रतीक आहेत. मात्र, या आनंदाच्या नावाखाली होणारा कर्णकर्कश आवाज इतरांसाठी त्रासदायक ठरू शकतो. त्यामुळे नागरिकांनी काय काळजी घ्यावी? तर डीजे व ध्वनिवर्धकांचा आवाज मर्यादेत ठेवावा. ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी आणि रुग्णांचा विचार करावा. रात्री उशिरापर्यंत मोठ्या आवाजात संगीत वाजवणे टाळावे. फटाक्यांचा अतिवापर टाळून ध्वनिप्रदूषण कमी करावे.डोळ्यांना इजा होण्याची शक्यता असलेल्या तीव्र लेझर किरणांचा वापर टाळावा. ढोल-ताशे, बँजो व इतर वाद्यांचा वापरही संयमाने करावा.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- उत्सवांच्या नावाखाली सुरू असलेल्या डीजेच्या कर्णकर्कश दणदणाटामुळे नागरिकांच्या शांततेचा भंग होत असून, ध्वनिप्रदूषणाबरोबरच आरोग्य व सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे डीजे, ढोल-ताशे, बँजो, फटाके तसेच डोळ्यांना त्रासदायक ठरणाऱ्या लेझर किरणांच्या वापरावर तातडीने नियंत्रण आणावे, अशी मागणी संगमनेर शहरातील नागरिकांनी केली आहे.

या मागणीसाठी नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन ॲड. निशा शिवरकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी संगमनेरच्या प्रांताधिकाऱ्यांकडे सादर केले. उत्सव आणि धार्मिक कार्यक्रम साजरे करण्यास विरोध नसून, उत्सवाच्या नावाखाली ध्वनिप्रदूषण करून ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी तसेच रुग्णांना होणारा त्रास थांबविणे आवश्यक असल्याची भूमिका निवेदनातून मांडण्यात आली. उत्सवांमध्ये मोठ्या आवाजात डीजे व इतर ध्वनिवर्धक यंत्रणांचा वापर, फटाक्यांची आतषबाजी तसेच लेझर किरणांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने नागरिकांना मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित नियमांची प्रभावी अंमलबजावणी करून ध्वनिप्रदूषण करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली.

दरम्यान, नागरिकांचे निवेदन नायब तहसीलदार मार्तंड माळवे यांनी स्वीकारले. नागरिकांनी मांडलेल्या मागणीबाबत वरिष्ठ पातळीवर चर्चा करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

उत्सवांचा आनंद अबाधित ठेवतानाच नागरिकांच्या आरोग्याचा, शांततेचा आणि सुरक्षिततेचा विचार करून डीजे व इतर ध्वनिप्रदूषण करणाऱ्या साधनांवर प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेते, याकडे आता संगमनेरकरांचे लक्ष लागले आहे.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी घेतला तयारीचा आढावा




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संगमनेर शहरातील नागरिक आणि गणेशभक्तांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी नगरपरिषद प्रशासनाने विविध पातळ्यांवर तयारी सुरू केली आहे. शहरातील रस्त्यांची दुरवस्था आणि ठिकठिकाणी पडलेले खड्डे लक्षात घेऊन नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांची प्रत्यक्ष भेट घेत रस्त्यांच्या तातडीच्या दुरुस्ती व डागडुजीची मागणी केली.

यावेळी संगमनेर शहरातील विविध प्रमुख रस्ते, खड्ड्यांची समस्या तसेच गणेशोत्सवाच्या काळात वाढणारी नागरिकांची वर्दळ याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सणासुदीच्या काळात खड्ड्यांमुळे नागरिक व गणेशभक्तांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी आवश्यक त्या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी आणि सर्व कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करावीत, अशी आग्रही मागणी करण्यात आली. यासंदर्भात समस्त संगमनेरकरांच्या भावना आणि विविध मागण्यांचे निवेदनही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

दरम्यान, गणेशोत्सवाच्या नियोजनाच्या दृष्टीने नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी संगमनेर शहरातील सर्व गणेश मंडळांच्या प्रतिनिधींशी प्रत्यक्ष संवाद साधला. उत्सवाच्या काळात मंडळांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी, समस्या तसेच आवश्यक सुविधा याबाबत त्यांच्याकडून प्रत्यक्ष माहिती जाणून घेण्यात आली.

गणेशोत्सव हा संगमनेर शहराचा उत्साह, श्रद्धा आणि एकोप्याचा सण असून तो भव्य, सुरक्षित, शिस्तबद्ध आणि आनंददायी वातावरणात पार पडावा, यासाठी नगरपालिका प्रशासन कटिबद्ध असल्याचे डॉ. मैथिली तांबे यांनी सांगितले. गणेश मंडळांना येणाऱ्या अडचणींवर तातडीने आणि योग्य तोडगा काढण्यासाठी नगरपालिका प्रशासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, असे आश्वासनही यावेळी देण्यात आले. रस्ते दुरुस्तीपासून गणेश मंडळांच्या समस्या सोडविण्यापर्यंत आवश्यक त्या उपाययोजना वेळेत पूर्ण करून संगमनेरचा गणेशोत्सव सुरक्षित आणि सुरळीत करण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाकडून विशेष प्रयत्न सुरू आहेत.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# धांदरफळ येथे महावितरण कर्मचाऱ्याला मारहाण

## तिघा बापलेकांविरुद्ध गुन्हा दाखल, शासकीय कामात अडथळा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - धांदरफळ बुद्रुक येथे वीजमीटर तपासणीसाठी गेलेल्या महावितरणच्या वरिष्ठ तंत्रज्ञाला लोखंडी रॉडने तसेच हाताच्या चापटांनी मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी शासकीय कामात अडथळा आणून मारहाण केल्याच्या आरोपावरून तिघा बापलेकांविरुद्ध संगमनेर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे वरिष्ठ तंत्रज्ञ यादव अशोक खाडे (वय ३२, रा. कसारा दुमाला रोड, संगमनेर) हे आपल्या सहकाऱ्यांसह धांदरफळ बुद्रुक येथील 'मेसर्स प्रदीप इंजिनिअरिंग वर्क्स' या दुकानाचे वीजमीटर तपासण्यासाठी गेले होते. यावेळी प्रदीप भास्कर धुमाळ, भास्कर रावसाहेब धुमाळ आणि गणेश भास्कर धुमाळ (सर्व रा. धांदरफळ बुद्रुक) यांनी खाडे यांच्याशी वाद घातल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. प्रदीप व गणेश धुमाळ यांनी खाडे यांना हाताच्या चापटांनी मारहाण केली, तर भास्कर धुमाळ याने लोखंडी रॉडने खाडे यांच्या मानेच्या मागील बाजूस प्रहार केल्याचा आरोप आहे. यावेळी महावितरणच्या इतर कर्मचाऱ्यांनी मध्यस्थी करून भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला. मात्र, आरोपींनी त्यांनाही अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली.




विज वितरण कंपनीचे कर्मचारी आपले काम करत असताना त्यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ अधिकारी, कर्मचाऱ्यांनी तालुका पोलीस ठाण्यात निवेदन देत कठोर कारवाईची मागणी केली.

तसेच, 'परत आमच्या गावात दिसलात तर दोन दिवसांत संपवून टाकू,' अशी धमकी देत महावितरणच्या कर्मचाऱ्यांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेत जखमी झालेल्या वरिष्ठ तंत्रज्ञ यादव खाडे यांना उपचारासाठी घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

खाडे यांच्या फिर्यादीवरून संगमनेर तालुका पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १३२, ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२) व ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल आर. ई. लांघे पुढील तपास करीत आहेत.

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस
ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
❊ कर्ज रक्कम वाढ । ❊ कर्ज व्याजदर कमी । ❊ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait. Neither DO WE
24 तास सुविधांसाठी
02425 - 224761
मोबा. 7038170382
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25